कोणतीही करदरवाढ नसलेला सन 24-25 पालिकेचा 942 कोटी 49 लाख 26 चे अंदाजपत्रक, वर्षअखेर 2 कोटी ५२ लाख २८ शिलकी अर्थसंकल्प मंजुर, नागरिकांना सर्व प्रकारच्या मुलभुत सेवा पुरविणे यावर विशेष भर....पालिका आयुक्त अजय वैद्य

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या सन 2023- 24 चे सुधारित अंदाजपत्रक 796 कोटी 35 लाख 17 हजार मात्र तयार करण्यात आले आहे. तसेच वित्तीय वर्ष सन 2024 -25 मध्ये महानगरपालिकेचे प्रारंभिक शिल्लक 161 कोटी 97 लाख 93 हजार अपेक्षित असून एकूण उत्पन्न प्रारंभिक शिलकेसह 942 कोटी 49 लाख 26 लाख मात्र अपेक्षित धरण्यात आलेले आहेत. या वर्ष अखेर 2 कोटी ५२ लाख २८ हजार शिलकीचा अर्थसंकल्प  मुख्य लेखा वित्त अधिकारी किरण तायडे यांनी पालिका प्रशासक तथा आयुक्त अजय वैद्य यांना सादर केला. पालिकेत प्रशासक अजय वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली अंदाजपत्रकीय एका विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळेला हा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. यावेळी पालिका अतिरिक्त  आयुक्त संजय हिरवाडे, विठ्ठल डाके, उपायुक्त मुख्यालय दीपक झिंजाड उपायुक्त प्रणाली घोंगे, मुख्य लेखापरीक्षक मयूर हिंगाणे, शहर अभियंता सुरेश भट,  अन्य. विभाग प्रमुख उपस्थित होते. यावेळी अंदाजपत्रकावर अंदाजपत्रक प्रशासकीय समिती सदस्य यांच्यामध्ये चर्चा होऊन अंदाजपत्रक मंजुर करण्यात आले.

मुख्य अर्थसंकल्प मंजुर केल्यावर पालिका आयुक्त तथा प्रशासक अजय वैद्य  यांनी पत्रकारांशी संवाद साधला त्यावेळेला पत्रकारांना माहिती देताना आयुक्त यांनी नमूद केले की, या वर्षी कोणतीही कर दरवाढ नसलेले अर्थसंकल्प आहे. सन 2023-24 या वर्षात विशेष उल्लेखनीय कामांचा आढावा पालिका आयुक्त यांनी घेतला. भिवंडी शहर आजुबाजुच्या परिसराला लागणा-या आगी लक्षात घेता, अग्निशमन विभागाकरता नवीन तीन फायर फायटिंग बाईक, दोन मिनी फायर इंजीन टेंडर,  साधन सामुग्री खरेदी करण्यात आली. पाणीपुरवठा विभागाकरता चार टँकर खरेदी करण्यात आले.

आरोग्य विभागाकरता तीन जेसीबी करण्यात आले. राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत हॉस्पिटल बीजेपी इमारतीचे बांधकाम अंतीम टप्यात आहे तर, चार नागरी आरोग्य केंद्र बांधण्यात आली. दिव्यांग लाभार्थींना पुढील प्रमाणे अर्थसहाय्य देण्यात आले. 65 लाभार्थी यांना वार्षिक वीस हजार प्रमाणे उदरनिर्वाह भत्ता, दहा लाभार्थ्यांना प्रति व्यक्ती पन्नास हजार प्रमाणे व्यवसायाकरिता अर्थसहाय्य विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली, तीन लाभार्थ्यांना प्रत्येकी 25000 प्रमाणे शैक्षणिक साहित्य उपकरण उपक्रम उपलब्ध करून देण्यात आले. दोन लाभार्थ्यांना प्रत्येकी 25000 प्रमाणे सहाय्यक उपकरणे खरेदी काम अनुदान देण्यात आले. या  वित्तीय वर्ष 2024-25 या अर्थसंकल्पात विशेष करून खालील बाबींवर ठेवण्यात आली आहे.मलनिसारण प्रकल्पासाठी चार एसटीपी प्लांट पैकी एक कार्यवाहीत केला आहे. उर्वरीत तीन कार्यान्वीत करण्याचे प्रस्तावीत आहे. शहरात अजय नगर स्मशानभूमी मध्ये एका गॅस वाहिनीचे गॅस वाहिनीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. महानगरपालिकेचा 50 खाटांचा बीजेपी दवाखाना सुरू करणे याकरता विशेष तरतूद करण्यात आलेली आहे. शहरात छत्रपती शिवाजी महाराज पुतळा उभारणे व परिसर सुशोभीकरण करण्याकरता शासनाकडून तीन कोटी अनुदान प्राप्त झाले आहे, त्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारणे आणि आजुबाजुचा परिसर सुशोभीकरण करण्याचं काम हाती घेण्यात येणार आहे. मालमत्ता उत्पन्ना वाढीकरीता सर्व मालमत्तांचा जीआयएस मॅपिंग सर्वे करण्यात येणार आहे. यामधून सर्व मालमत्तांच्या सर्वेक्षण करून त्या मालमत्तेवर सुधारीत कर आकारणी करणे व महानगरपालिकेचे महसूल उत्पन्न वाढवणे हा मुख्य उद्देश आहे.

नागरिकांना  मूलभूत सोयी सुविधा पुरविणे अंतर्गत सात कोटी व नगरोत्थानकरता नऊ कोटी महापालिकेचा हिस्सा या तरतूद करण्यात आली आहे. शहरातील एकूण वीस किलोमीटर लांबीचे 82  सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते बांधणे, सन 2024- 25 मधील मूलभूत सोयी सुविधा व महाराष्ट्र सुवर्ण नगरोत्थान अभियांतर्गत शासन निधीतून तयार करण्याचे प्रस्तावित आहे. महानगरपालिका शाळा इमारती बळकटीकरण करणे व बँचेस पुरवणे याकरता दीड कोटी तरतूद ठेवण्यात आली असून 1800 बँचेस पुरविण्याचे उद्दिष्ट आहे. या वर्षात स्वर्गीय मीनाताई ठाकरेचे नूतनीकरण काम पुर्ण करणे या कोटी 15 कोटी निधी शासनाकडे मागणी केली असून त्याचे काम सुरू

आहे,एकात्मिक पाणीपुरवठा योजना टप्पा क्रमांक 1अ  योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या 16 पाणाच्या टाक्यांपैकी दोन टाक्या वापरात असून लवकरच पाच टाक्या  वापरात येऊन शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यावर भर देण्यात आला आहे.

सन 2024-25 या वर्षांमध्ये बीजेपी हॉस्पिटल येथे सौर ऊर्जा प्रकल्प उभारणे कामी 50 लाखाची तरतूद करण्यात आलेली असून अपारंपारिक ऊर्जा स्तोत्रापासून वीजनिर्मिती व पर्यावरण पूरक वीज तयार करणेकामी मानस आहे. केंद्रशासन पुरस्कृत अमृत 2.0 झिरो अभियानांतर्गत पाणीपुरवठा प्रकल्पास शंभर एम.एल.डी पाणी साठी पालिकेचा हिस्सा रुपये 15 कोटी तरतूद ठेवण्यात आली आहे. स्वच्छ भारत अभियानांतर्गत कम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्प उभारणे व पाच सार्वजनिक शौचालय बांधणे, पाच ठिकाणी मुता-या  बांधणे व 3133 वैयक्तिक शौचालय बांधण्याकरता अनुदान देण्यात नमूद करण्यात आले आहे.

शहरातील तीन बेघर निवारा केंद्र कार्यान्वित ठेवणे देखभाल व दुरुस्ती कामी रू 60.40 लक्ष  तरतूद ठेवण्यात आली आहे. अग्निशमन विभागाकरता हायराईज फायर टॉवर 32 मिटर पर्यंत स्कॉय लिफ्ट करीता 14 कोटी 8 लक्ष खऱेदी करणेकामी शासनाकडून अनुदानाची मागणी करण्यात आली आहे. शहरातील सर्व नागरिकांना सर्व मूलभूत सोयी सुविधा चांगल्या प्रकारे पुरविण्याचा प्रशासन प्रयत्न या अर्थसंकल्पातून करण्यात आला आहे.शहराच्या विकासामध्ये सर्व लोकप्रतिनिधी यांचा चागंले सहकार्य मिळत आहे. त्यांच्या माध्यमातून विविध विकास कामांकरीता निधी उपलब्ध होत आहे. सर्व लोकप्रतिनिधी यांचे आभार व्यक्त करताना, शहर विकासात नागरिकांची साथ देखील  महत्वाची आहे. नागरिकांनी जर आपले कर वेळच्यावेळी भरले तर नागरिकांना अधिक चांगल्या प्रकारे सोयी देता येतील, अनधिकृत बांधकामे न करता जर परवानगी घेवून बांधकामे केली तर विकास निधी चांगल्या प्रकारे जमा होईल. वेगवेगळ्या मार्गाने पालिकेचे उत्पन्न वाढविणे आवश्यक आहे व त्याकरीता सर्व नागरिकांची साथ मिळेल  असा विश्वास पालिका आयुक्त यांनी या प्रसंगी व्यक्त केला. अर्थ संकल्पातून शहरातील नागरिकांना सर्व प्रकारच्या मुलभूत सोयी सुविधा  देण्याचा तसेच विविध नविन विकास प्रकल्प राबविण्याचा प्रयत्न पालिकेने केला आहे, असे प्रशासक अजय वैद्य यांनी नमूद केले.